(L) FYBMM (M) Prin. of mgmt.

OP3AFE

March 2016

वेळ : २.३० तास

गुण : ७५

सूचना १) सर्व प्रश्न सोडवा.

२) उजवीकडील संख्या गुण दर्शवितात.

प्रश्न १ ला : **केस स्टडी.**

आशिया खंडातील एक बहुराष्ट्रीय कंपनी आहे. तिच्या जगभरात १२ महत्त्वाच्या शहरात शाखा आहेत. या १२ शाखांमध्ये प्रत्येकी एक मुख्य व्यवस्थापक आणि अनेक सहाय्यक व्यवस्थापक असे जाळे जगभर पसरलेले आहे. ही बहुराष्ट्रीय कंपनी १०० वर्षे जुनी आहे. अलीकडे कंपनीद्वारे अनेक नवीन प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. कंपनीतील उत्पादनासंबंधी, वितरणासंबंधी, विपणनासंबंधी (मार्केटिंग संबंधी) सर्व निर्णय कंपनीच्या चायना येथील मुख्यालयातच घेतले जातात. मुख्य कार्यालयात कंपनी संबंधित आराखडे बनवले जातात, नियोजन केले जाते व ते महत्त्वाच्या शाखांकडे पाठविले जाते. मुख्य व्यवस्थापकाकडे हे आराखडे (प्लॅनस्) आल्यावर त्याआधारे ते दुय्यम आराखडे (प्लॅनस्) बनवितात. पुढे हे आराखडे सहाय्यक व्यवस्थापकाकडे दिले जातात व त्याप्रमाणे त्यांना काम करावे लागते. हा सर्व एकतर्फी संवादाचा व निर्णयाचा प्रकार आहे.

मागील काही वर्षांपासून कंपनीस काही गंभीर समस्या भेडसावत आहेत. त्यामुळे त्यांचे विविध प्रकारच्या उत्पादनावर परिणाम होऊन विक्री कमी झाली आहे. बहुतेक सर्व शाखांमध्ये कर्मचारी व्यवस्थापनातही समस्या निर्माण झाल्या आहेत. व्यवस्थापकीय समन्वयक त्यांच्यामधील ताणतणाव दूर करायचा प्रयत्न करतोय. समन्वयकांच्या अभ्यासानुसार त्याने एक अहवाल तयार केला. त्यात त्याने असे नमूद केले कंपनीचे मुख्यालय व तिच्या सर्व शाखांमध्ये योग्य समन्वय, संवाद नाही. तसेच नियंत्रणातही बऱ्याच त्रुटी आहेत. समन्वयकाने असे सुचविले आहे की, मुख्यालयाने सर्व शाखा अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन एकत्रितपणे संघभावनेने संघटितपणे काम केले पाहिजे. तसेच मुख्यालयाने शाखा अधिकाऱ्यांना त्या त्या शाखेसंबंधीत निर्णयस्वातंत्र्य ही द्यायला हवे. मुख्यालयाने सर्वांवर नियंत्रण ठेवावे पण शाखा कार्यात ढवळाढवळ करू नये तर कंपनीच्या सर्व शाखांचा कारभार पूर्ववत सुरळीत होईल.

**प्रश्न :**

१. कंपनीच्या मुख्यालयाकडून कोणकोणती महत्त्वाची कार्ये दुर्लक्षिली गेली व कशी? (५)

२. कंपनीने कशाप्रकारे संघटन केले पाहिजे जेणेकरून कर्मचाऱ्यांमध्ये विश्वास वाढेल? (५)

३. कंपनीने एकत्रितपणे संघभावनेने काम केले तर उत्पादनात आणि मिळणाऱ्या नफ्यात कशाप्रकारे वाढ होऊ शकते? (५)

OP3AFE

प्रश्न २ रा : अ. मिण्टझ्बर्गने सांगितलेली व्यवस्थापकाची भूमिका स्पष्ट करा. (०८)

ब. हेन्री फेयॉलने व्यवस्थापनाची कोणती सूत्रे सांगितली. (०७)

**किंवा**

अ. 'संघटन ही व्यवस्थापनातील महत्त्वाची प्रक्रिया आहे' यावर टीप लिहा. (०८)

ब. नेतृत्व म्हणजे काय? नेतृत्वाचे कोणकोणते प्रकार असतात? (०७)

प्रश्न ३ रा : अ. निर्णय क्षमता म्हणजे काय? निर्णय प्रक्रियेचे व्यवस्थापनातील महत्त्व सांगा. (०८)

ब. व्यवस्थापनाची सामाजिक जबाबदारी म्हणजे काय? (०७)

**किंवा**

अ. कर्मचारी नियुक्तीची गरज कशासाठी असते? (०८)

ब. व्यवस्थापकाची कोणतीही पाच वैशिष्ट्ये सांगा. (०७)

प्रश्न ४ था : अ. 'आपत्ती व्यवस्थापन' यावर टीप लिहा. (०८)

ब. पीटर ड्रकर यांची व्यवस्थापन संकल्पना सांगा. (०७)

**किंवा**

अ. ताणतणाव म्हणजे काय? त्यांची कारणे कोणती असतात. (०८)

ब. व्यवस्थापनाची आवश्यकता का असते? (०७)

प्रश्न ५ वा : टीपा लिहा (कोणत्याही तीन) (१५)

१. पर्यावरणाचे प्रदूषण.

२. बदलांचे व्यवस्थापन.

३. संघर्ष.

४. मार्क टेलरचे व्यवस्थापन विचार.

५. आदर्श व्यवस्थापक.